http://www.sgbauonline.com/



# B.A. (Part–II) Examination

## (Optional Subject)

## MARATHI LITERATURE

## (Literatures of Modern Languages)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. खालील गद्य-पद्य खंडाचे संदर्भासह स्पष्टीकरण द्या :

(अ) 'आबै आबै : द्वारावतीचे चांगदेओ राउळ तेचि आमुचे गोसावी'.

किंवा

'एतुके दीस तप केलें : तयाचें फळ आजि जालें.'

(आ) 'जी जी : हा होडेचा ससा जी : सा कारणें सूरीया काढणीया होती : जी जी : हा सोडावा जी.'

किंवा

'सूख होत असे रे : तवं एह्र म्हणें : पां पां : जी माझीये पाठीवरि बैसा.'

(इ) दया हे मुख्य धर्म लक्षण। परि दया म्हणजे प्राण्यांचे पालन।
आणि कंटकांचे निर्दालन। बोलिले संतीं।।

किंवा

'खेड्याकडे चला' म्हणता। परि एकहि सोय नसे पाहता।
घरे कसली ? हुडेचि तत्वता। डुकरखोपडे, खुराडे।।

(ई) लाभेल व्यायामाचे फळ। कामामाजीच सकळ।
निसर्गची देईल आरोग्यबळ। सर्व लोका।।

किंवा

तळले, विटले खाऊ नये। आंबट, खारट सेवू नये
तैसे अति गोडहि जेवू नये। भोजनी कोणी।। 20

2. 'लीळाचरित्र : एकांक' या ग्रंथातील लोकजीवनाचा परिचय घडवा

किंवा

'लीळाचरित्र : एकांक' या ग्रंथाचे वाङ्मयीन विशेष उलगडून दाखवा. 20

3. 'ग्रामनिर्माण पंचक' मधील काव्यसौंदर्य व वैशिष्ट्ये विशद करा.

किंवा

'ग्रामरक्षण' या अध्यायातील भावार्थ राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या शब्दात स्पष्ट करा. 20

4. साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेस कोणत्या शक्ती कारणीभूत होतात ? ते स्पष्ट करा.

किंवा

व्यवहारभाषा आणि साहित्यभाषा यामधील फरक स्पष्ट करा. 20

5. शास्त्रीय वाङ्मय आणि साहित्य यामधील फरक सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

साहित्य निर्मितीमागे कोणकोणती प्रयोजने असतात, ते समजावून सांगा. 20



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/